प्रभात पुणे, मंगळवार, दि. २३ जुलै २०१९ ४

# झीलच्या विद्यार्थ्यांची 'सी-डॅक'ला भेट




**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारातील सी-डॅक या संगणक संस्थेला भेट दिली. यात द्वितीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यासाठी परम सुपरकॉम्प्युटरच्या विविधपूर्ण वैशिष्ट्यांविषयी विद्यार्थ्यांनी सखोल माहिती घेतली. तेथील अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या तांत्रिक तपशिलाचा विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर ऑरगायनेझशन अ‍ॅन्ड आर्किटेक्चर या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये नक्कीच फायदा होणार आहे. ही भेट आयोजित करण्यासाठी संस्थेचे सचिव जयेश काटकर, कार्यकारी संचालक प्रदीप खांडवे, प्राचार्य डॉ. अजित काटे आणि विभाग प्रमुख डॉ. योगेश गुरव यांचे मार्गदर्शन लाभले. या औद्योगिक भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. निहाल शिकलगार, प्रा. प्रणालिनी जोशी, प्रा. अमरनाथ चडचणकर आणि प्रा. शितल बाचपल्ले यांनी परिश्रम घेतले.

ZES's Zeal College of Engineering & Research
LIBRARY
800
ZCOER
Narhe, Pune-41.